**<u>ठळक बातम्या</u>**

- पाच विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर तिथं राजकीय हालचालींना वेग

- देशातल्या वाहनांच्या किरकोळ विक्रीत एप्रिलपर्यंत १२ पूर्णांक ९४ शंताश टक्के वाढ

- पश्चिम आशियात युद्ध थांबलं नाही तर पुढच्या वर्षी जगात आर्थिक वाढीच्या दरात अडीच टक्के घट होऊ शकते असा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

- इराणने संयुक्त अरब अमिरातीवर केलेल्या हल्ल्याचा अनेक देशातून निषेध

**आणि**

- आनंद आर. के. आणि सुवर्णा शर्मा या पत्रकारांना यंदाचा पुलित्झर पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, आसाम आणि केंद्रशासित प्रदेश पुदुच्चेरीमध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूत सत्ताधारी पक्षांचा दणदणीत पराभव झाला असून दोन्ही ठिकाणच्या पदस्थित मुख्यमंत्र्यांचा आपापल्या मतदारसंघात पराभव झाला.
ऐकूया याबाबत सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधी कडून ….

**होल्ड व्हीसी**

*(पश्चिम बंगालमध्ये, भाजपनं प्रचंड बहुमत मिळवून इतिहास घडवला. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणानंतर होणाऱ्या पहिल्याच निवडणुकीत, 15 वर्षे सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला पराभव पत्करावा लागला.*

*पश्चिम बंगाल मध्ये भाजपने २०६ जागा जिंकून,स्पष्ट बहुमत मिळवलं आहे, तर तृणमूल काँग्रेसने ८० जागा जिंकल्या आहेत. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला केवळ २ जागांवर समाधान मानावं लागलं तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला एका जागेवर विजय मिळाला. तृणमूल काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. भबानीपूर मतदारसंघात, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांचा, भाजपाचे उमेदवार सुवेंदू अधिकारी यांनी सुमारे १५ हजार मतांनी पराभव केला.*

*दरम्यान, निवडणूक आयोगाने फालता मतदारसंघात २१ मे रोजी फेरमतदान घेण्याचे आदेश दिले आहेत. मतमोजणी २४ तारखेला होईल.*

*तमिळनाडूमधे तमिळ वेत्री कळ्ळगम हा सर्वात मोठा पक्ष ठरला असून पक्षाध्यक्ष जोसेफ विजय यांची विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड झाली आहे. टीव्हीकेला २३४ पैकी १०८ जागा मिळाल्या असून सत्ता स्थापनेसाठी आवश्यक बहुमत सिद्ध करण्याची संधी द्यावी अशी ई मेल विजय यांनी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांना लिहीली आहे.*

*दरम्यान एम के स्टॅलिन यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा आज राज्यपालांकडे सुपूर्द केला. आपल्या मतदारांचे त्यांनी आभार मानले. ५९ जागांवर विजयी झालेला द्रमुक पक्ष जबाबदार आणि ताकदवान विरोधी पक्षाची भूमिका निभावेल असं त्यांनी म्हटलं आहे.*

*केरळात मतदारांनी काँग्रेसप्रणित युडीएफला संधी दिली आहे. यूडीएफला १०२ जागा मिळाल्या तर सत्ताधारी एल डी एफला ३५ जागांवर समाधान मानावं लागलं. भाजपाला प्रथमच केरळात यश मिळालं आहे. त्यांचे ३ उमेदवार निवडून आले. दरम्यान मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी पदाचा राजीनामा दिला असून नवीन सरकारस्थापनेपर्यंत ते काळजीवाहू मुख्यमंत्री असतील.*

*आसाममधे मतदारांनी सत्ताधारी भाजपावर पुन्हा विश्वास दाखवला आहे. आसाममधे भाजपाने ८२ जागा जिंकल्या असून मित्रपक्ष आसाम गण परिषदेनं १० जागा तर, बोडोलँड पीपल्स फ्रंटनं १० जागा मिळवल्या आहेत. काँग्रेसला १९ जागांवर विजय मिळाला असून, ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटनं २ जागा जिंकल्या आहेत.*

*पुदुचेरीमध्ये, ३० पैकी १८ जागांवर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भरघोस बहुमत मिळालं. एनडीएचा घटक पक्ष ऑल इंडिया एनआर काँग्रेसने १२ जागा, तर भाजपानं ४ जागा जिंकल्या. ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम आणि लच्छिया जननायगा कची यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे. काँग्रेसला एक जागा मिळाली.तर टिव्हीके ला दोन जागा मिळाल्या. )*

**<><><><><>**

देशातल्या वाहनांच्या किरकोळ विक्रीत एप्रिलपर्यंत १२ पूर्णांक ९४ शंताश टक्के वाढ नोंदवण्यात आली असून देशात विक्रमी २६ लाख ११ हजार ३१७ वाहनांची विक्री झाली आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात २३ लाख, १२ हजार २२१ वाहनांची विक्री झाली होती.

फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशन फाडानं आज ही माहिती दिली. वस्तू आणि सेवाकरात अर्थात जीसटीमध्ये झालेली कपात, केंद्रीय बँकांचे व्याज दर , रब्बी पिकांच्या उत्पादनातल्या वाढीमुळे ग्रामीण भागात वाढलेल्या रोकड या वाढीला सहाय्यक झाल्याचं फाडानं म्हटलं आहे. या वर्षीच्या एप्रिल महिन्यात ४ लाख ७ हजार ३५५ वाहनांची विक्रमी वाढ नोंदवण्यात आली. या महिन्यात १९ लाख १६ हजार २५८ दुचाकी वाहनांची विक्री झाल्याचंही फाडानं दिलेल्या माहितीत म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष २०२७ पर्यंत  सुरू राहिला तर जागतिक अर्थव्यवस्थेला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हटलं आहे. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाचे दर शंभर डॉलर प्रति बॅरल किंवा त्यापेक्षा जास्त आहे, महागाईचा भार वाढत आहे, हीच परिस्थिती कायम राहिली तर तेलाचे दर १२५ डॉलर प्रति बॅरल पर्यंत जातील असं नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्तलिना जॉर्जिया म्हणाल्या. यामुळे जागतिक आर्थिक वाढीचा दर अडीच टक्क्यापर्यंत कमी होऊ शकतो तसंच महागाई दर जवळपास साडे पाच टक्क्यापर्यंत वाढू शकतो असं नाणेनिधीने म्हटलं आहे.

<><><><><>

इराणने संयुक्त अरब अमिरातीवर केलेल्या हल्ल्याचा पश्चिम आशियातल्या देशांनी निषेध करत या हल्ल्यांमुळे प्रादेशिक अस्थैर्य निर्माण होण्याची भीती असल्याचं असं म्हटलं आहे.  सौदी अरबचे राजपुत्र आणि प्रधानमंत्री मोहम्मद बिन सलमान यांनी या हल्ल्याचा निषेध केला. तसंच त्यांनी संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद  साधत पाठिंबा दर्शवला.

हा हल्ला संयुक्त अरब अमिरातीच्या सार्वभौमत्वाचं उल्लंघन असल्याचं इजिप्त, कतार आणि जॉर्डनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे. अरब देशांच्या संघटनेच्या महासचिवांनी या हल्ल्याचा निषेध केला असून यूएईला पाठिंबा दर्शवला आहे.

भारतानंही या हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून संयुक्त अरब अमिरातील पाठिंबा दर्शवला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून विना अडथळा नौवहन होणं जागतिक स्थैर्यासाठी आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात तीन भारतीय जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

आखाती भागात अमेरिका आणि इराणने केलेल्या नव्या हल्ल्यांमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीवरच्या नियंत्रणाच्या मुद्द्यावर तणाव वाढला आहे. सामुद्रधुनीत अडकलेल्या व्यापारी जहाजांना आणि टँकर्सना जलमार्गातून जाण्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने प्रोजेक्ट फ्रीडम नावाचा उपक्रम अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केला आणि क्षेपणास्त्र तसंच ड्रोन डागले. त्यामुळे इराणच्या सहा लहान लष्करी बोटी नष्ट झाल्या असून मालवाहू जहाजांवरच्या हल्ल्यात पाच जण ठार झाले आहेत. तर इराणने प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात संयुक्त अरब अमिरातीतल्या अमेरिकेचा लष्करी तळ असलेल्या एका तेल बंदराला आग लागली.

**<><><><><>**

अमेरिकेने गेल्या महिन्यात ताब्यात घेतलेल्या इराणी जहाजावरल्या २२ पैकी १५ कर्मचाऱ्यांना मुक्त केलं आहे. इराणचं तौस्का हे जहाज अमेरिकेने ओमानच्या आखातात १९ एप्रिलला ताब्यात घेतलं होतं. या जहाजावर २८ कर्मचारी होते, यातल्या सहा जणांना लगेच सोडून देण्यात आलं होतं. आता १५ जणांना सोडण्यात आलं असून ते इराणला परतले आहेत, असं इराणच्या वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. या जहाजाने अमेरिकेच्या नाकेबंदीचं उल्लंघन केल्यामुळे जहाज जप्त केल्याचं अमेरिकेनं सांगितलं.

**<><><><><>**

भारतातल्या सायबर गुन्हेगारीचं वृत्तांकन करणाऱ्या दोन भारतीय पत्रकारांना प्रतिष्ठेचा पुलित्झर पुरस्कार मिळाला आहे. पुलित्झरच्या सचित्र वार्तांकन आणि भाष्य या श्रेणीत आनंद आर. के. आणि सुवर्णा शर्मा यांना हा पुरस्कार मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय वार्तांकन श्रेणीत हनोईस्थित पत्रकार अनिरुद्ध घोषाल यांना पुरस्कार मिळाला आहे. गुप्तपणे पाळत ठेवणाऱ्या उपकरणांच्या विविध देशांकडून होणाऱ्या वापराच्या वृत्तांकनासाठी घोषाल यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

**<><><><><>**

केरळमध्ये एनाथू इथं आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात मल्याळम अभिनेता संतोष नायर यांचा मृत्यू झाला. नायर आपल्या गाडीतून सपत्नीक प्रवास करत असताना सकाळी साडे सहाच्या सुमाराला त्यांची गाडी एका लॉरीला धडकल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांची

पत्नी जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. नायर यांनी १९८२मध्ये प्रदर्शित झालेल्या इथू नंगलुडे कथा या चित्रपटातून पदार्पण केलं होतं. त्यानंतर त्यांनी १००पेक्षा जास्त चित्रपटांमधून नायक, खलनायक, सहाय्यक अभिनेता अशा विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या.

<><><><><>

व्हिएतनामचे राष्ट्रपती तो लाम तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. नवी दिल्लीतल्या हैदराबाद हाऊस इथं ते आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असून त्यांच्यात द्विपक्षीय बैठक होणार आहे. या बैठकीत व्यापार, गुंतवणूक आणि धोरणात्मक सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. त्यानंतर, ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज संघांमध्ये सामना होणार आहे. दिल्लीत अरूण जेटली मैदानावर सायंकाळी साडे सात वाजता सामना सुरू होईल.

//<><><><><>//